# -:जाहीर अवाहन:-

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राज्यातील संभाव्य चारा टंचाईची तिव्रता कमी करण्या करिता वैरण बियाणे व खते वितरण या योजनेचा लाभ उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद, तुळजापुर, लोहारा, कळंब, वाशी व परांडा तालुक्यातील लाभार्थीना द्यावयाचा आहे. सदर योजनेत सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या पशुपालक/शेतकरी यांना वैरण बियाणे व खते वितरीत करण्यासाठी १० गुंठे ते १ हेक्टर मर्यादेपर्यंत बियाणे अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या योजनेत अर्ज स्विकारण्याचा कालावधी दि. २९/१०/२०१८ ते १२/११/२०१८ असुन विहीत नमुन्यातील अर्ज नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेमध्ये स्विकारण्यात येतील.

अधीकच्या माहितीसाठी संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी विस्तार व नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थाप्रमुख यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

सदर योजनेत पात्र लाभार्थीने जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घेण्याबाबत चे अवाहन करण्यात येत आहे. तरी सदरच्या बातमीला लोकहितार्थ एन आय सी च्या संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
उस्मानाबाद